नवराष्ट्र

## NAAC Visit to Indira Mahavidyalaya 21 and 22 October 2024

### महाविद्यालयाच्या विशेष प्रगतीवर समाधान

# इंदिरा महाविद्यालयाला नॅक समितीने दिली भेट



कळंब, (ता. प्र.). स्थानिक इंदिरा महाविद्यालयाला नुकतीच राष्ट्रीय स्तरावरील नॅक समितीने भेट देऊन सर्वांगीण तपासणी केली आणि महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण प्रगतीवर विशेष समाधान व्यक्त केले.

कार्यकारी संस्थाचालक डॉ. सिंधू मांडवकर व प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांनी समितीचे स्वागत केले. याप्रसंगी संस्थाचालक व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. दुपारी झालेल्या माजी विद्यार्थी, पालक आणि विद्यार्थ्यांच्या सभेमध्ये सर्वांनीच अत्यंत भरभरून महाविद्यालयाची प्रशंसा करणारे उद्गार काढल्याने समिती भारावून गेली. विद्यार्थ्यांनी तयार केलेले मॉडेल्स, आर्ट गॅलरी आणि विविध विभागांना भेटी देताना विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. सायंकाळी डॉ. वीरा मांडवकर यांच्या मार्गदर्शनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्येही विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट असे कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली.या भेटीच्या पूर्वतयारीसाठी गेल्या दोन वर्षांपासून प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांच्या नेतृत्वात समन्वयक प्रा. प्रशांत जवादे आणि सहसमन्वयक डॉ. कैलाश नेमाडे यांच्या मार्गदर्शनात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम घेतले, त्यामुळे महाविद्यालयात चांगला दर्जा प्राप्त होईल, अशी अपेक्षा संस्थाध्यक्ष युगंधर मांडवकर यांनी व्यक्त केली.उपमुख्याध्यापक दिलीप नन्नावरे, पर्यवेक्षक प्रफुल्ल वानखेडे, रूपेश नामदेववार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सत्कार केला.

### समितीच्या सदस्यांनी केले समाधान व्यक्त

चेन्नई येथील भारत इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रकुलगुरू डॉ. सुरेश हे या समितीचे अध्यक्ष होते. आसामच्या डिब्रुगड विद्यापीठ, जैविक विज्ञान विभागाचे प्रमुख प्रोफेसर डॉ. दीपशिखा बोरा ह्या समन्वयक सदस्य आणि लुधियाना, पंजाबचे गुजरानवाला गुरूनानक खालसा कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरविंदर सिंग भल्ला हे सदस्य म्हणून उपस्थित होते. दोन दिवसांच्या सखोल तपासणीमध्ये समितीने शैक्षणिक प्रगती, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन, इमारती व खेळ क्रीडा सुविधा, संस्थात्मक साहचर्य आणि परिसरातील गरजांनुसार उपलब्ध केलेले अभ्यासक्रम, अशा सर्वच बाबतीत प्रत्यक्ष पाहणी आणि कागदपत्रांची तपासणी केली. महाविद्यालयाच्या केलेल्या तयारीवर समाधान व्यक्त केले.

Yavatmal Plus Edition
Oct 25, 2024 Page No. 2
Powered by: NavaRashtra.com

एक अस्त्र निर्भीड...निपक्ष...निस्पृह लोकप्रिय दैनिक सिंहझेप



# इंदिरा महाविद्यालयाला नॅक समितीची भेट

**सिंहझेप, कळंब :** स्थानिक इंदिरा महाविद्यालयाला नुकतीच राष्ट्रीय स्तरावरील नॅक समितीने भेट देऊन सर्वांगीण तपासणी केली आणि महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण प्रगतीवर विशेष समाधान व्यक्त केले. चेन्नई येथील भारत इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रकुलगुरू डॉ. सुरेश हे या समितीचे अध्यक्ष होते तर डिब्रुगड विद्यापीठ, आसामच्या जैविक विज्ञान विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. दीपशिखा बोरा ह्या समन्वयक सदस्य आणि गुजरानवाला गुरूनानक खालसा कॉलेज, लुधियाना, पंजाबचे प्राचार्य डॉ. अरविंदर सिंग भल्ला हे सदस्य म्हणून उपस्थित होते. दोन दिवसांच्या सखोल तपासणीमध्ये समितीने शैक्षणिक प्रगती, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन, इमारती व खेळ क्रीडा सुविधा, संस्थात्मक साहचर्य आणि परिसरातील गरजांनुसार उपलब्ध केलेले अभ्यासक्रम अशा सर्वच बाबतीत प्रत्यक्ष पाहणी आणि कागदपत्रांची तपासणी करून महाविद्यालयाच्या तिसऱ्या सायकलसाठी केलेल्या तयारीवर समाधान व्यक्त केले. कार्यकारी संस्थाचालक त्र्यांणव वर्षे वयाच्या डॉ. सिंधू मांडवकर व प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांनी समितीचे स्वागत केले. याप्रसंगी संस्थाचालक व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. दुपारी झालेल्या माजी विद्यार्थी, पालक आणि विद्यार्थ्यांच्या सभेमध्ये सर्वांनीच अत्यंत भरभरून महाविद्यालयाची प्रशंसा करणारे उद्गार काढल्याने समिती भारावून गेली. विद्यार्थ्यांनी तयार केलेले मॉडेल्स, आर्ट गॅलरी आणि विविध विभागांना भेटी देताना विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. सायंकाळी डॉ. वीरा मांडवकर यांच्या मार्गदर्शनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य असे आयोजन करण्यात आले. यामध्येही विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट असे कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या भेटीच्या पूर्वतयारीसाठी गेल्या दोन वर्षांपासून प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांच्या नेतृत्वात समन्वयक प्रा. प्रशांत जवादे आणि सहसमन्वयक डॉ. कैलाश नेमाडे यांच्या मार्गदर्शनात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम घेतले, त्यामुळे महाविद्यालयात चांगला दर्जा प्राप्त होईल, अशी अपेक्षा संस्थाध्यक्ष युगंधर मांडवकर यांनी व्यक्त केली.

नवजीवन

# इंदिरा महाविद्यालयाला नॅक समितीची भेट




**महादेव गुडेवार, नवजीवन**

**यवतमाळ** : स्थानिक, इंदिरा कळंब महाविद्यालयाला नुकतीच राष्ट्रीय स्तरावरील नॅक समितीने भेट देऊन सर्वांगीण तपासणी केली आणि महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण प्रगतीवर विशेष समाधान व्यक्त केले.

चेन्नई येथील भारत इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रकुलगुरू डॉ. सुरेश हे या समितीचे अध्यक्ष होते तर डिब्रुगड विद्यापीठ, आसामच्या जैविक विज्ञान विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. दीपशिखा बोरा ह्या समन्वयक सदस्य आणि गुजरानवाला गुरूनानक खालसा कॉलेज, लुधियाना, पंजाबचे प्राचार्य डॉ. अरविंदर सिंग भल्ला हे सदस्य म्हणून उपस्थित होते.

दोन दिवसांच्या सखोल तपासणीमध्ये समितीने शैक्षणिक प्रगती, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन, इमारती व खेळ क्रीडा सुविधा, संस्थात्मक साहचर्य आणि परिसरातील गरजांनुसार उपलब्ध केलेले अभ्यासक्रम अशा सर्वच बाबतीत प्रत्यक्ष पाहणी आणि कागदपत्रांची तपासणी करून महाविद्यालयाच्या तिसऱ्या सायकलसाठी केलेल्या तयारीवर समाधान व्यक्त केले.

कार्यकारी संस्थाचालक त्र्यांणव वर्षे वयाच्या डॉ. सिंधू मांडवकर व प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांनी समितीचे स्वागत केले. याप्रसंगी संस्थाचालक व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दुपारी झालेल्या माजी विद्यार्थी, पालक आणि विद्यार्थ्यांच्या सभेमध्ये सर्वांनीच अत्यंत भरभरून महाविद्यालयाची प्रशंसा करणारे उद्गार काढल्याने समिती भारावून गेली.

विद्यार्थ्यांनी तयार केलेले मॉडेल्स, आर्ट गॅलरी आणि विविध विभागांना भेटी देताना विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. सायंकाळी डॉ. वीरा मांडवकर यांच्या मार्गदर्शनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य असे आयोजन करण्यात आले. यामध्येही विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट असे कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या भेटीच्या पूर्वतयारीसाठी गेल्या दोन वर्षांपासून प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांच्या नेतृत्वात समन्वयक प्रा. प्रशांत जवादे आणि सहसमन्वयक डॉ. कैलाश नेमाडे यांच्या मार्गदर्शनात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम घेतले, त्यामुळे महाविद्यालयात चांगला दर्जा प्राप्त होईल, अशी अपेक्षा संस्थाध्यक्ष युगंधर मांडवकर यांनी व्यक्त केली.